# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 10.01.2013 (का.प.क्र.22) (दि.05/01/13 ची तहकुब) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक 10.01.2013 (का.प.क्र.22) (दि.05/01/13 ची तहकुब) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.45 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा शहर अभियंता श्री.एम.डी.सोनवणे, विधी सहाय्यक तथा प्र.नगर सचिव, श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
02. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
03. स. श्री.आगा खान मिया खान
04. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
05. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
06. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
07. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
08. स. श्री. खान अक्रम करीम खान
09. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
10. स. श्री.मो.मुजीबोद्दीन कदीरोद्दीन
11. स. श्री.समिर सुभाष राजुरकर

**विषय क्र. 116 :** (विषय क्र. 109 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 31/12/2012 (का.प.क्र.21) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती : विषय क्रमांक 116 स्थगीत.**

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 117 :** (विषय क्र. 110 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 31/12/2012 (का.प.क्र.21) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 27/07/2012 (का.प.क्र.7), 03/08/2012 (का.प.क्र.8), 10/08/2012 (का.प.क्र.9), 21/08/2012 (का.प.क्र.10), 28/08/2012 (दि.21/08/2012 ची तहकुब सभा) (का.प.क्र.10), 28/08/2012 (का.प.क्र.11) व 07/09/2012 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती : विषय क्रमांक 117 स्थगीत.**

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 118 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, स्वामी विवेकानंद उद्यान टी.व्ही. सेंटर मजनुहिल येथे महात्मा बसवेश्वर यांचा अश्वरूढ पुतळा उभारणे बाबत शहरातील विविध सामाजिक संघटनांनी मागणी केली होती. तशी विनंती पत्रे प्रशासनास प्राप्त झालेली होती त्यानुसार सदर प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.348 दिनांक 18/05/2012 नुसार मान्यता प्रदान केली आहे.

सदरील प्रस्तावा अंतर्गत नियोजीत महात्मा बसवेश्वर यांचा अश्वारूढ पुतळयाचा परिसर विकसीत करणे करीता सा.बा. विभागाचे सन 2011-12 च्या दरसुची नुसार रक्कम रू.100.00 लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तसेच पुतळा उभारणे व त्यासाठी आवश्यक चबुतरा बांधणे यासाठी रक्कम रू.50.00 लक्षचे अंदाजपत्रकीय खर्च ग्रहीत धरण्यात आला आहे. असा एकुण रक्कम रू.150.00 लक्ष खर्च अपेक्षित आहे. यापैकी रक्कम रू.100.00 लक्षच्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.669 दिनांक 21/03/2012 अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. सन 2012-13 या आर्थिक वर्षा अंतर्गत सदर कामासाठी रक्कम रू.25.00 लक्षची तरतुद (Ward-B, Spill 40 अ.क्र.7) पुतळे दुरूस्ती व इतर या लेखाशिर्षकाअंतर्गत ठेवण्यात आलेली होती तथापी मा.महापौर यांनी अंकीत केल्यानुसार सदरची तरतुद नियोजीत महात्मा बसवेश्वर पुतळयाचा परिसर विकसीत करणे या कामाकरीता वळती करण्यात आली आहे. या कामासाठी रक्कम रू.86,43,185/- ची निविदा ई-निविदा विभागामार्फत मागविण्यात आल्या असता एकुण 5 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असुन त्याचा तपशिल खालील नमुद प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|
| 01. | नाझ डेव्हलपर्स | अ.प.दरापेक्षा 11.11 % कमी दराने |
| 02. | काझी गोहमोहीनुउद्दीन | अ.प.दरापेक्षा 8.86 % कमी दराने |
| 03. | ड्रिम लॅण्ड कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 7.9 % कमी दराने |
| 04. | स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी | अ.प.दरापेक्षा 7.25 % कमी दराने |
| 05. | शहा कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 2.25 % कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.11 % कमी दराची निविदा नाझ डेव्हलपर्स यांची प्राप्त झालेली आहे. सदर निविदा मा.स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार नाझ डेव्हलपर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.11 % कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा.सभापती** :विषय क्रमांक 118 च्या बाबतीत जी तरतुद ठेवण्यात आलेली आहे त्याबाबत माहिती देण्यात यावी.

**शहर अभियंता** :महात्मा बसेश्वर यांचा पुतळा मजनुहिल गार्डनमध्ये बसविण्यासाठी या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये 1 कोटीची तरतुद आहे त्यातुन हि कामे आहे.

**मा.सभापती** :विषय मंजूर

**श्री.रेणुकादास वैद्य** :आदरणीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा अमरप्रित चौकात करण्याचे ठरले आहे अर्थसंकल्पात तरतुद नव्हती म्हणुन या वर्षी अर्थसंकल्पात 1 कोटी रूपयांची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. परंतु प्रशासनाने याकडे पुरेशा प्रमाणात लक्ष घातलेले नाही. या विषयी जे अंदाजपत्रक, लेआऊट यासर्व गोष्टींची लवकरात लवकर पुर्तता व्हावी.

**मा.सभापती** :खुलासा करण्यात यावा.

**शहर अभियंता** :मा.सर्वसाधारण सभेने स्वर्गीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा अमरप्रितच्या चौकात बसवावा असा प्रस्ताव घेतलेला आहे त्यानुषंगाने वार्ड ड कार्यालयाअंतर्गत कारवाई सुरू करण्यात आली होती. एकुण स्टेशन सर्वे केलेला आहे. जी जागा शिल्लक राहते ती मोजण्यात आलेली आहे. 45 मिटरच्या जालना रोडमध्ये तो बाधीत होत आहे. फार कमी जागा राहत

असुन सुशोभीकरणासाठी जागा कमी पडतांना दिसत आहे. याकरीता एडीटीपी विभागाकडे संचिका पाठविण्यात आलेली आहे. त्यांचा अभिप्राय आलेला आहे की, डिपीरोडमध्ये बाधीत होत नाही. पुतळा बसविण्यासाठी शासनाच्या नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी म्हणुन लिहिलेले आहे. काम केल्यास तो रस्त्यात येईल. चौकात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :अशा प्रकारे खुलासा करून स्वर्गीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे पुतळयाला खोडा घालण्याचे काम करण्यात येत आहे.

शहर अभियंता :जागा कमी पडेल असा प्रशासनाचे म्हणने आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.खासदार, मा.आमदार व सर्व पदाधिकाऱ्यांनी, प्रशासनाने या जागेची स्थळ पहाणी केलेली आहे व जागा निश्चित केली आहे. रस्त्यामध्ये जागा येत नाही हे पाहिल्यावरच मा.सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव प्रस्तावित केला होता. पुतळा आतमधील साईडला राहतो रस्ता पुढे राहतो. या कामामध्ये खोडा घालण्यात येवु नये. याचे ताबडतोब अंदाजपत्रक तयार करून कामाला सुरूवात कराव्यात.

श्री.बाळासाहेब मुंडे :रोडचा जो मुद्दा उपस्थित केलेला आहे क्रांतीचौकचा रोड तो तसाच आहे. जागा भरपुर आहे. लवकरात लवकर मंजूरी करण्यात यावी.

शहर अभियंता :वस्तुस्थिती सभेसमारे ठेवण्यात आलेली आहे. सत्य परिस्थिती समोर ठेवण्यात आलेली आहे. सभेचा जो निर्णय होईल तो प्रशासनाला मान्य असेल.

श्री.समीर राजुरकर :हिंदु ह्यदयसम्राट मा.श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे पुतळयासंदर्भात स.सदस्यांनी ज्या सूचना मांडलेल्या आहेत व मा.सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले आहे प्रस्तावित आहे त्या जागेवर पुतळा उभारणीचे काम लवकरात लवकर चालु करावे. डाव्यासाईडला फिटनेस जिमच्या बाजुला मोठी जागा आहे ती कालांतराने मिळेल तेव्हा ती पाहता येईल. सर्वसाधारण सभेने जो ठराव मंजूर केलेला आहे तो तात्काळ अंमलात आणुन पुतळा उभारणीचे काम करण्यात यावे. प्रशासनाने याबाबतीत सर्व कार्यवाही करून अंदाजपत्रक व इतर कामे पार पाडायला पाहिजे होते. दोन महिने थांबण्यासारखा विषय नाही. सर्वांनी स्थळ पहाणी करून सर्वांनी मंजूरी दिलेली आहे. कामास विलंब न लावता पुतळा आणि स्मारक उभारणीचे काम तात्काळ करण्यात यावे.

श्री.गिरजाराम हळनोर :सर्वांनी स्थळ पहाणी करून मा.सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे. चांगल्या कामामध्ये खोडा घालण्याचे काम करण्यात येवु नये. आजच्या आज या कामाचे टाईमबॉन्ड प्रोग्राम देण्यात यावा.

श्री.गिरजाराम हाळनोर :माहिती देण्यात यावी. मा.सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार ठरलेल्या जागेवरच काम करायचे आहे. 45 मीटरचा रस्ता सोडुन पुतळा उभारणीचे काम करायचे आहे.

शहर अभियंता :मा.सर्वसाधारण सभेने ठराव घेतल्याबरोबर विभागाने कार्यवाही सुरू केलेली आहे. सदर कामाची निवीदा 8 ते 15 दिवसांत काढण्यात येईल. पुतळा बसविण्याचा ऑफर येतात. त्यानंतर इस्टीमेट तयार केले जातात. यावर्षी तरतुद ठेवण्यात आलेली आहे त्यामुळे याकामाला काही अडचण येणार नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर :टाईमबॉन्ड प्रोग्राम सांगण्यात यावा.

मा.सभापती :पुतळा कोण बनविणार यासाठी निवीदा काढावी लागणार आहे. तज्ञ मंडळीकडुन मॉडल मागवुन स.पदाधिकारी व काही सन्मानिय पाहतील आणि त्यांनाच काम देण्यात येईल. जी वास्तु उभारण्यात येणार आहे त्याचे सॅम्पल, प्लॅन यासाठी निवीदा काढावी लागणार आहे. प्रशासनाने साईड बाय साईड इस्टीमेट काढण्याची कार्यवाही करण्यात यावी.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्वामी विवेकानंद उद्यान टी.व्ही. सेंटर मजनुहिल येथे महात्मा बसवेश्वर यांचा अश्वरूढ पुतळा उभारणे आणि पुतळयाचा परिसर विकसीत करणेच्या कामासाठी मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.348 दिनांक 18/05/2012 अन्वये मान्यता दिल्यानुसार सदर कामांतर्गत नियोजीत महात्मा बसवेश्वर पुतळयाचा परिसर विकसीत करणे या कामासाठी रक्कम रू.86,43,185/- च्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.11% कमी दराची नाझ डेव्हलपर्स यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 119 :

कार्यकारी अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सेव्हनहिल उड्डाणपुलावर पथदिव्यांचे नुतणीकरण करण्याचे कामाचे अंदाजपत्रक सन 2011-12 सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची तसेच बजाज कंपनीच्या कोटेशन नुसार रक्कम रू.49,98,605/- चे तयार करण्यांत आले असून, सदरचे काम अर्थसंकल्प 2012-13 मधील लेखाशिर्षक विकास योजने अंतर्गत बाधित विद्युत खांब व रोहित्र स्थलांतरीत करणे मधुन प्रस्तावित करण्यांत आलेले आहे. सदर कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता, एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी मे.मातोश्री इलेक्ट्रीकल यांनी कागदपत्रांची पुर्तता न केल्यामूळे त्यांची निविदा उघडण्यांत आलेली नाही. उर्वरीत दोन निविदा उघडण्यांत आल्या, त्यांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

01. मे.ईगल इलेक्ट्रीकल 8.5 % अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने

02. मे.ब्राईट इलेक्ट्रीकल वर्क्स 13.13 % अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.5% जास्त दराने मे.ईगल इलेक्ट्रीकल यांची निविदा आहे. संबंधीतास दराच्या वाटाघाटीसाठी बोलावण्यांत आले असता, संबंधीत गुत्तेदार यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने करण्यास सहमती दर्शविली आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी प्रशासकीय मान्यता देवुन मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

करीता मे.ईगल इलेक्ट्रीकल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

संवाद :

श्री.समीर राजुरकर :स्थायी समितीमध्ये गेल्या दोन महिण्यांपासून पायलट प्राजेक्टची चर्चा चालु आहे. अधिकारी यांचे धन्यवाद करण्यात येतो. 4 महिण्यांनंतर एजन्सी फिक्सींगसाठी विषय सभागृहापुढे आणला. सदरील रोडवर आठ महिण्यांत रात्रीचे वेळी 45 अपघात झालेले आहे. त्यामुळे सदरील काम तात्काळ करण्यात यावे व सभागृहातील मा.सभापती व जेष्ठ सदस्य यांनी लाईट फिटींग, चोक बजाज कंपणीची आहेत का याची खात्री करून बिल अदा करण्यात यावी. कंपणीतर्फे कंम्पलिशन सर्टीफिकेट घेण्यात यावे. जनतेच्या टॅक्समधुन आलेल्या पैशातुन जनतेसाठी केली जाणारी सुविधा आहे. सर्व पारदर्शक असायला हवे. बजाज कंपणीचे अथॉराईझ डिलर असेल तर बजाज कंपणीचे काम संपल्यानंतर कंम्पलायन्स पुर्ण झाल्याचे

प्रमाणपत्र बिलासोबत लावावे.

श्री.रेणुकादास वैद्य :उड्डाणपुल देखणा झाल्यास शहरात असे काम करता येईल. निवीदे प्रक्रीयेमध्ये ज्याकाही स्पेसिफिकेशन ठेवलेल्या आहेत त्यांचे तंतोतंत पालन करण्यात यावे. पोल लावतांना काळजी घेण्यात यावी . शहरातील मध्यवर्ती ठिकाण आहे त्या ठिकाणाहुन पर्यटक जात असतात त्यामुळे बारीक बारीक गोष्टींची काळजी घेण्यात यावी. प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी.

श्री. समीर राजुरकर :लक्सोमीटरने चेक करण्यात यावे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांचे अभिनंदन करण्यात येते. स.सदस्य श्री.राजुरकर यांनी सांगीतल्याप्रमाणे वरली सिंलींगच्या धर्तीवर पोल बसविण्यात आलेले आहे. फिटींगच्या बाबतीत प्रशासनाने काळजी घेतली पाहिजे. भविष्यात कुठल्याही प्रकारचा अपघात होऊ नये. सॅम्पल लाईट लावल्यानंतर लक्सोमीटरच्या साहयाने रिडींग घेण्यात यावी. सर्व सन्मानिय यांना सॅम्पल दाखविण्यात यावे. बजाज कंपणीचे अथॉराईझ डिलर असेल तर बजाज कंपणीचे काम संपल्यानंतर कंम्पलायन्स पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र बिलासोबत लावण्यात यावे. विषयास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सेव्हनहिल उड्डाणपुलावर पथदिव्यांचे नुतणीकरण करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.ईगल इलेक्ट्रीकल यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 120 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड अ अंतर्गत येणाऱ्या एकुण 16 प्रभागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनीक बांधकाम / म. जी. प्रा. खात्याच्या सन 2011- 2012 च्या दरसुचीनुसार महानगरपालिकेने रक्कम रु. 2,12,19,874/- चे तयार करण्यात आले आहे. यास मा.सर्वसाधारण सभेने दि. 18/10/2012 रोजी ठराव क्र. 954 नुसार प्रशासकीय मान्यता दिली आहे. डांबरीकरणांच्या कामात सुसूत्रता व कामाचे नियोजन योग्य रित्या होऊन काम वेळेवर होण्याकरिता B-2 फार्ममध्ये (Item Rate) करण्याची मा.आयुक्त महोदय यांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामाकरिता ई- निविदा विभागामार्फत जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 02 निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत- 02 निविदा प्राप्त झाल्या दिलेल्या बाब निहाय दराची गणीती प्रमाणे त्यांचा तुलनात्मकदृष्ट्या खालील प्रमाणे येत आहे.

1. श्री. के. बी. पाथ्रीकर - अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रू. 2,12,19,874.00/- बाब निहाय निविदा दरानुसार किंमत रक्कम रू. 2,40,52,727/-
2. श्री. ए .एस. कन्स्ट्रक्शन - अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रू. 2,12,19,874.00/- बाब निहाय निविदा दरानुसार किंमत रक्कम रू. 2,55,52,972/-

दोन्ही पैकी श्री. के. बी. पाथ्रीकर यांचे प्राप्त बाब निहाय निविदा दर हे एल-1 (L-1) असुन अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा जास्तीचे येत असल्याने प्राप्त दराबाबत वाटाघाटी करणेसाठी मा.आयुक्त यांनी आदेशित केल्यानूसार शहर अभियंता, मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व तांत्रिक कक्षप्रमुख यांनी एकत्रितपणे संबंधीत गुत्तेदारासोबत प्रत्यक्ष दर वाटाघाटी केली असता संबंधीत गुत्तेदाराने भरलेल्या निविदा रक्कमेमध्ये 5.25 % दराची सुट / Rebate मान्य केल्यानुसार

**नमुद कामावर अपेक्षित खर्च रक्कम रू.2,29,38,683.00/- होणार आहे. त्यानुसार मा.आयुक्त, यांनी मान्यता दिली आहे व प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत सादर करणेची शिफारस केली आहे.**

**करिता नमुद काम बाब निहाय दरात 5.25% दराची सुट / Rebate सह श्री.के.बी.पाथ्रीकर यांचे कडुन करुन घेणेच्या B- 2 फार्म बाब निहाय दर निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.**

**संवाद :**

**श्री.रेणुकादास वैद्य** :डांबरीकरणाचे काम एकत्रित करण्यात येत आहे. विषय मंजूर करत असतांना कंत्राटदारांना टाईमबॉन्ड कार्यक्रम देण्यात यावा. वेळ टाकण्यात यावी एक महिण्यामध्ये कामे संपली पाहिजे. कंत्राटदार अर्ध्ये कामे करून बिल भेटत नाही म्हणुन काम अर्धेवट सोडुन देतो. ज्या प्रभागात 16 वार्ड आहे तेथील एका वार्डाचे चार दिवसात काम झाले पाहिजे अशी सिस्टीम लावण्यात यावी. काम झाले नाही तर शहरात मोठया प्रमाणात अडचणी येवु शकतात. प्रशासनाने याचे योग्य पध्दतीने नियोजन करून अंमलबजावणी करण्यात यावी. प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**मा.सभापती** :बी-2 च्या माध्यमातुन डांबरीकरणाचे काम हाती घेतलेले आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे काम घेतलेले आहे. सर्व स.नगरसेवकांची कामे झाली पाहिजे एका प्रभागासाठी एकच कंत्राटदार असायला पाहिजे. त्यामुळे प्रशासनाचे योग्यरित्या कंत्राटदारावर नियंत्रण राहते. स.सदस्यांनी मांडलेल्या मुद्दयानुसार सर्व कामे योग्य पध्दतीने करण्यात यावी.

**श्री.गिरजाराम हळनोर** :17 वार्डाचे इस्टीमेट एकत्र करून एकाच कंत्राटदाराला काम दिलेले आहे चांगली सिस्टीम आहे. गणपती उत्सवाच्या वेळेस पॅचवर्कचे टेंडर काढण्यात आले होते सदरील टेंडर हे उत्सवापुरते न ठेवता पुर्ण वर्षभरासाठी काढण्यात आले होते. माझ्या वार्डात अद्यापपर्यंत पॅचवर्क झालेले नाही. याही गोष्टीकडे लक्ष द्यायला पाहिजे. त्याच प्रमाणे डांबरीकरणाचे कामेही सर्व नगरसेवकांच्या वार्डात करण्यात यावे त्यांची ओरड येता कामा नाही. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे.

**मा.सभापती** :एकाच कंत्रटदाराशी संपर्क साधावयाचा आहे. प्रशासनाने स.सदस्यांच्या भावना विचारात घेऊन योग्य प्रकारे व नियामानुसार काम करण्यात यावे. विषय क्रमांक 120 ते 123 मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड अ अंतर्गत येणाऱ्या एकुण 16 प्रभागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी B-2 फार्ममध्ये (Item Rate) ई- निविदा विभागामार्फत जाहीर निविदा मागविल्यानुसार प्राप्त कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार संबंधीत गुत्तेदाराने भरलेल्या निविदा रक्कमेमध्ये बाबनिहाय दरात 5.25% दराची सुट / Rebate मान्य केल्यानुसार सदरील काम श्री.के.बी.पाथ्रीकर यांचेकडून करून घेण्यास व या कामावर अपेक्षित रक्कम रू.2,29,38,683.00/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 121 :**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड ड अंतर्गत येणाऱ्या एकुण 16 पैकी 14 प्रभागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनीक बांधकाम /म. जी. प्रा. खात्याच्या सन 2011 - 2012 च्या दरसुचीनुसार महानगरपालिकेने रक्कम रु.3,61,97000/- चे तयार करण्यात आले आहे. यास मा.सर्वसाधारण सभेने दि. 18/10/2012 रोजी ठराव क्र. 957**

नुसार प्रशासकीय मान्यता दिली आहे. डांबरीकरणांच्या कामात सुसूत्रता व कामाचे नियोजन योग्य रित्या होऊन काम वेळेवर होण्याकरिता B - 2 फार्ममध्ये (Item Rate) करण्याची मा.आयुक्त महोदय यांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामाकरिता ई- निविदा विभागामार्फत जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 02 निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत- 02 निविदा प्राप्त झाल्या दिलेल्या बाब निहाय दराची गणीती प्रमाणे त्यांचा तुलनात्मकदृष्ट्या खालील प्रमाणे येत आहे.

1. श्री. एम. ए. सिद्दीकी - अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रू. 3,61,96,616.13/- बाब निहाय निविदा दरानुसार किंमत रक्कम रू. 4,17,67,275/-

2. श्री. आदीनाथ कन्स्ट्रक्शन - अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रू. 3,61,96,616.13/- बाब निहाय निविदा दरानुसार किंमत रक्कम रू. 4,28,71,272/-

दोन्ही पैकी श्री. एम. ए. सिद्दीकी यांचे प्राप्त बाब निहाय निविदा दर हे एल-1 (L-1) असून अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा जास्तीचे येत असल्याने प्राप्त दराबाबत वाटाघाटी करणेसाठी मा.आयुक्त यांनी आदेशित केल्यानूसार शहर अभियंता, मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व तांत्रिक कक्षप्रमुख यांनी एकत्रितपणे संबंधीत गुत्तेदारासोबत प्रत्यक्ष दर वाटाघाटी केली असता संबंधीत गुत्तेदाराने भरलेल्या निविदे रक्कमेमध्ये 5.25 % दराची सुट / Rebate मान्य केल्यानुसार नमुद कामावर अपेक्षित खर्च रक्कम रू.3,98,66,953/- होणार आहे. त्यानुसार मा.आयुक्त, यांनी यास मान्यता दिली आहे व प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेत सादर करणेची शिफारस केली आहे.

करिता नमुद काम बाब निहाय दरात 5.25 % दराची सुट / Rebate सह श्री.एम.ए.सिद्दीकी यांचे कडुन करुन घेणेच्या B - 2 फार्म बाब निहाय दर निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड ड अंतर्गत येणाऱ्या एकुण 16 पैकी 14 प्रभागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी B-2 फार्ममध्ये (Item Rate) ई- निविदा विभागामार्फत जाहीर निविदा मागविल्यानुसार प्राप्त कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार संबंधीत गुत्तेदाराने भरलेल्या निविदा रक्कमेमध्ये बाबनिहाय दरात 5.25% दराची सुट / Rebate मान्य केल्यानुसार सदरील काम श्री.एम.ए.सिद्यीकी यांचेकडून करून घेण्यास व या कामावर अपेक्षित रक्कम रू.3,98,66,953/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 122 :

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड ई अंतर्गत येणाऱ्या एकुण 16 पैकी 14 प्रभागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनीक बांधकाम / म. जी. प्रा. खात्याच्या सन 2011 - 2012 च्या दरसुचीनुसार महानगरपालिकेने रक्कम रु.1,04,62,362/- चे तयार करण्यात आले आहे. यास मा.सर्वसाधारण सभेने दि. 18/10/2012 रोजी ठराव क्र. 958 नुसार प्रशासकीय मान्यता दिली आहे. डांबरीकरणांच्या कामात सुसूत्रता व कामाचे नियोजन योग्य रित्या होऊन काम वेळेवर होण्याकरिता B - 2 फार्ममध्ये (Item Rate) करण्याची मा.आयुक्त महोदय यांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामाकरिता ई - निविदा विभागामार्फत जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 02 निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत - 02 निविदा प्राप्त झाल्या दिलेल्या बाब निहाय दराची गणीती प्रमाणे त्यांचा तुलनात्मकदृष्ट्या खालील प्रमाणे येत आहे.

**1. मे. अरोरा कन्स्ट्रक्शन** - **अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रू. 1,04,62,360.68/- बाब निहाय निविदा दरानुसार किंमत रक्कम रू. 1,20,49,500/-**

**2. श्री. आदीनाथ कन्स्ट्रक्शन** - **अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रू. 1,04,62,360.68/- बाब निहाय निविदा दरानुसार किंमत रक्कम रू. 1,23,88,481/-**

**दोन्ही पैकी मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे प्राप्त बाब निहाय निविदा दर हे एल-1 (L-1) असून अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा जास्तीचे येत असल्याने प्राप्त दराबाबत वाटाघाटी करणेसाठी मा.आयुक्त यांनी आदेशित केल्यानूसार शहर अभियंता, मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व तांत्रिक कक्षप्रमुख यांनी एकत्रितपणे संबंधीत गुत्तेदारासोबत प्रत्यक्ष दर वाटाघाटी केली असता संबंधीत गुत्तेदाराने भरलेल्या निविदा रक्मेमध्ये 5.25 % दराची सुट / Rebate मान्य केल्यानुसार नमुद कामावर अपेक्षित खर्च रक्कम रू.1,15,00,226/- होणार आहे. त्यानुसार मा.आयुक्त, यांनी यास मान्यता दिली आहे व प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत सादर करणेची शिफारस केली आहे.**

**करिता नमुद काम बाब निहाय दरात 5.25 % दराची सुट / Rebate सह मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे कडुन करुन घेणेच्या B - 2 फार्म बाब निहाय दर निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड ई अंतर्गत येणाऱ्या एकुण 16 पैकी 14 प्रभागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी B-2 फार्ममध्ये (Item Rate) ई- निविदा विभागामार्फत जाहीर निविदा मागविल्यानुसार प्राप्त कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार संबंधीत गुत्तेदाराने भरलेल्या निविदा रक्कमेमध्ये बाबनिहाय दरात 5.25% दराची सुट / Rebate मान्य केल्यानुसार सदरील काम मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांचेकडून करून घेण्यास व या कामावर अपेक्षित रक्कम रू.1,15,00,226/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 123 :**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड फ अंतर्गत येणाऱ्या एकुण 17 प्रभागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनीक बांधकाम / म. जी. प्रा. खात्याच्या सन 2011 - 2012 च्या दरसुचीनुसार महानगरपालिकेने रक्कम रु. 3,93,69,406/- चे तयार करण्यात आले आहे. यास मा.सर्वसाधारण सभेन दि. 18/10/2012 रोजी ठराव क्र.959 नुसार प्रशासकीय मान्यता दिली आहे. डांबरीकरणांच्या कामात सुसूत्रता व कामाचे नियोजन योग्य रित्या होऊन काम वेळेवर होण्याकरिता B-2 फार्ममध्ये (Item Rate) करण्याची मा.आयुक्त महोदय यांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामाकरिता ई - निविदा विभागामार्फत जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 02 निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत - 02 निविदा प्राप्त झाल्या दिलेल्या बाब निहाय दराची गणीती प्रमाणे त्यांचा तुलनात्मकदृष्ट्या खालील प्रमाणे येत आहे.**

**1. मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन** - **अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रू. 3,91,29,819.25/- बाब निहाय निविदा दरानुसार किंमत रक्कम रू. 4,87,12,712/-**

**2. श्री. एम. ए. सिद्दीकी** - **अंदाजपत्रकीय किंमत रक्कम रू. 3,91,29,819.25/- बाब निहाय निविदा दरानुसार किंमत रक्कम रू. 5,15,22,233/-**

**दोन्ही पैकी मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचे प्राप्त बाब निहाय निविदा दर हे एल-1 (L-1) असून अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा जास्तीचे येत असल्याने प्राप्त दराबाबत वाटाघाटी करणेसाठी मा.आयुक्त यांनी आदेशित केल्यानूसार शहर अभियंता, मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व तांत्रिक कक्षप्रमुख यांनी एकत्रितपणे संबंधीत गुत्तेदारासोबत प्रत्यक्ष दर वाटाघाटी केली असता संबंधीत गुत्तेदाराने भरलेल्या निविदा रक्कमेमध्ये 5.25% दराची सुट / Rebate मान्य केल्यानुसार कामावर अपेक्षित खर्च रक्कम रू.4,66,58,396/- होणार आहे. त्यानुसार मा.आयुक्त, यांनी यास मान्यता दिली आहे व प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत सादर करणेची शिफारस केली आहे.**

**करिता नमुद काम बाब निहाय दरात 5.25% दराची सुट / Rebate सह मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचे कडुन करुन घेणेच्या B-2 फार्म बाब निहाय दर निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.**

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड फ अंतर्गत येणाऱ्या एकुण 17 प्रभागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी B-2 फार्ममध्ये (Item Rate) ई- निविदा विभागामार्फत जाहीर निविदा मागविल्यानुसार प्राप्त कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार संबंधीत गुत्तेदाराने भरलेल्या निविदा रक्कमेमध्ये बाबनिहाय दरात 5.25% दराची सुट / Rebate मान्य केल्यानुसार सदरील काम मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून करून घेण्यास व या कामावर अपेक्षित रक्कम रू.4,66,58,396/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**याचबरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**